पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
मा. फ प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक १
## सभावृत्तांत

दिनांक – १०/०४/२०१५

वेळ : दुपारी ४.४०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या "फ" प्रभाग समितीची विशेष सभा शुक्रवार दिनांक १०/०४/२०१५ रोजी दुपारी ४.४० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील मा. महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात श्री ओमप्रकाश बकोरिया, पीठासीन अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात आली. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा. सोनावणे पौर्णीमा रविंद्र (आप्पा)
२. मा. भालेकर शांताराम कोंडीबा ऊर्फ एस के बापू
३. मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
४. मा. जाधव साधना रामदास
५. मा. बहीरवाडे नारायण सदाशिव
६. मा. मंगलाताई अशोक कदम
७. मा. तानाजी विठ्ठल खाडे
८. मा. बो-हाडे शुभांगी संजय
९. मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन

याशिवाय श्री. दिलीप गावडे, क्षेत्रीय अधिकारी, श्री. विजय वाघमारे, प्रशासन अधिकारी, "फ" क्षेत्रीय कार्यालय हे उपस्थित होते.

-------

**अतिरिक्त मनपा आयुक्त पुणे महानगरपालिका - (पीठासीन अधिकारी)**

सन्मा. सदस्य, क्षेत्रीय अधिकारी,उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या सभेत मा."फ" प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा. विभागीय आयुक्त यांनी सभेचा पीठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. मा. "फ" प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सूचना करतो.**

**मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव ( सभाशाखा)**

मा. "फ" प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणुक करणेकामी एकाच उमेदवाराचे एकूण २ नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामधील उमेदवार, त्यांचे सूचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | मा. बो-हाडे शुभांगी संजय | मा. पौर्णिमा रविंद्र(आप्पा) सोनवणे | मा. जाधव साधना रामदास |
| २ | मा. बो-हाडे शुभांगी संजय | मा.सौ. मंगलाताई अशोक कदम | मा. सौ. ठाकरे मंदाकिनी अर्जून |

मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव ( सभाशाखा) यांनी त्यांना प्राप्त झालेले उपरोक्त नामनिर्देशन पत्रे मा. पीठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केली. मा. पीठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली.

**अतिरिक्त मनपा आयुक्त पुणे महानगरपालिका - (पीठासीन अधिकारी)**

मा. "फ" प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या एकाच उमेदवाराची उपरोक्त एकूण 2 नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली असून ती 2 नामनिर्देशन पत्रे वैध ठरविण्यात आलेली आहेत.
त्यामध्ये मा. "फ" प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या मा. बो-हाडे शुभांगी संजय हया एकच वैधरित्या नामनिर्देशित उमेदवार आहेत.

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा. पीठासीन अधिकारी यांचेकडे देवुन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल.

(मा. पीठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेला दुपारी ४.४१ ते ४.५६ हा १५ मिनिटांचा कालावधी संपला. )

उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटाच्या कालावधीमध्ये उमेदवाराने उमेदवारी माघारीचा अर्ज दिला नाही.

**अतिरिक्त मनपा आयुक्त पुणे महानगरपालिका - (पीठासीन अधिकारी)**

उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या अवधीमध्ये मा. फ प्रभाग समिती पीठासीन पदाची निवडणूक लढविणारे मा. बो-हाडे शुभांगी संजय हया एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

ठराव क्रमांक – १
दिनांक – १०/०४/२०१५

विषय क्रमांक – १
विभाग – प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. "फ" प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या २(दोन) नामनिर्देशन पत्रामधील मा. "फ" प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या मा. बो-हाडे शुभांगी संजय ह्या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने मा. बो-हाडे शुभांगी संजय यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या "फ" प्रभाग समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

10-04-15

**(श्री. ओमप्रकाश बकोरिया)**
**पीठासीन अधिकारी तथा**
**अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त**
**पुणे महानगरपालिका, पुणे**

------

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय, निगडी ४४
क्रमांक : फक्षेका/७/काबि/५९ /२०१५
दिनांक : १०/०४/२०१५

**प्रशासन अधिकारी**
**तथा सचिव सभाशाखा**
**फ प्रभाग समिती**

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**यानंतर मा. बो-हाडे शुभांगी संजय** यांनी सभेचे सभापती पदाचे स्थान स्विकारले

------

ठराव क्रमांक – २
दिनांक – १०/०४/२०१५
सुचक.......मा. शांताराम भालेकर

विषय क्रमांक – २
विभाग – प्रशासन
अनुमोदक ......मा. तानाजी खाडे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. “फ” प्रभाग समिती सभेचा दिवस दर महिन्याचे दुसरा शुक्रवार दुपारी १२.०० वा. फ क्षेत्रीय कार्यालयामधील राजर्षी शाहु महाराज सभागृह येथे निश्चित करणेत येत आहे.

यानंतर मा. पीठासीन अधिकारी यांनी सभा संपल्याचे जाहीर केले

( बो-हाडे शुभांगी संजय )
**सभापती**
**“फ” प्रभाग समिती**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय, निगडी ४४
क्रमांक : फक्षेका/७/कावि/५९ /२०१५
दिनांक : १०/०४/२०१५

**प्रशासन अधिकारी**
**तथा सचिव सभाशाखा**
**फ प्रभाग समिती**

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.